जा.क्र./लामनपा/सा.बां./8524/2026
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.
दिनांक :- 5/11/2026

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.
कोटेशन क्र. 16/2026-27 (तिसरी मागणी)
म.न.पा. निधी
सार्वजनिक बांधकाम विभाग

आयुक्त लातूर शहर महानगरपालिका, लातूरच्या वतीने खालील नमुद केलेल्या कामासाठी शासनाचे पंजीबद्ध असलेल्या श्रेणी त्या वर्गातील कंत्राटदाराकडून कोटेशन मागविण्यात येत आहेत. कोटेशन संबंधी आवश्यक ती माहिती कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात उपलब्ध होऊ शकेल. कोरे कोटेशन विक्रीचा दिनांक 5/11/2026 ते 12/11/2026 दुपारी 2.00 वाजेपर्यंत व कोटेशन स्विकृतीचा दिनांक 12/11/2026 रोजी दुपारी 4.00 वाजेपर्यंत पर्यंत राहील. शक्य झाल्यास कोटेशन त्याच दिवशी उघडण्यात येतील. कामाची मुदत 1 महिने राहील

अ क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय किंमत	बयाणा रक्कम	कोरे कोटेशन किंमत	कंत्राटदाराचा वर्ग
1	प्र.क्र. १२ मध्ये नालीचे बांधकाम करणे.	280054.00	3000	500	वर्ग 9 व त्यावरील

अटी व शर्ती :-

१) अजोसोबत पात्र वर्गातील महाराष्ट्र शासनाचे पंजीबद्ध असल्याचे प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर केल्यावर कोटेशन प्रपत्र देण्यात येईल

२) बयाणा रक्कम ही आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांचे नावे राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. / बँकर्स चेक / नगदी रक्कम भरुन कोटेशन सोबत जोडावी लागेल.

३) कोटेशन तीन लिफाफामध्ये सादर करावे. लिफाफ्यावर कोटेशन क्रमांक, कामाचा अनुक्रमांक, कामाचे नाव एजन्सीचे नाव असणे बंधनकारक आहे. लिफाफा क्र. १ मध्ये नोंदणी प्रमाणपत्र, बयाणा रक्कम, जी.एस.टी., पॅनकार्ड, ई.पी.एफ. रजिस्ट्रेशन व मागील महिन्याचे चलन प्रत, अनुभव व व्यवसायकर नादेय प्रमाणपत्र इत्यादी व लिफाफ्यावर लिफाफा क्रमांक कोटेशन क्रमांक, कामाचा अनुक्रमांक, कामाचे नाव, एजन्सीचे नाव इ. असल्याशिवाय लिफाफा क्र. २ उघडला जाणार नाही दुस-या लिफाफ्यावरही लिफाफा क्रमांक, कोटेशन क्रमांक, कामाचा अनुक्रमांक, कामाचे नाव, एजन्सीचे नाव असणे आवश्यक आहे

४) कोटेशन सादर करणा-यास बी-१ प्रपत्रातील सर्व अटी बंधनकारक राहतील.

५) सार्वजनिक बांधकाम विभागातील संपूर्ण अटी व शर्ती बंधनकारक राहतील

६) प्राईस एक्सलेशन लागू राहणार नाही.

७) कोणतेही कारण न देता कोटेशन प्राप्तीचे अर्ज आणि कोटेशन नाकारण्याचा किंवा स्विकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

अतिरीक्त आयुक्त,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.